ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-IV July - August 2021

# आसराबाई दराडे इंग्लिश मिडियम स्कुल (एस.एस.सी बोर्ड) येथील 9 वीच्या विद्यार्थ्यांना अवांतर वाचनात आवड नसण्याच्या कारणांचा शोध घेणे

डॉ. वैशाली पुंजाराम सूर्यवंशी

*प्राचार्य,*

*मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक*

## प्रास्ताविक –

शालेय जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होणे आवश्यक असते. भारतात आज शालेय स्तरावर मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचा समावेश अनुक्रमे प्रथम, व्दितीय भाषा म्हणून केला. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा बोलतात, लिहीतात, वाचता येणे अतिशय महत्त्वाचे आहे.

अध्ययनाच्या अपुऱ्या सवयीमुळे व विद्यार्थ्यांच्या दुर्लक्षामुळे तसेच शिक्षकांच्या पारंपारिक अध्यापनामुळे भाषा विकास मुबलक प्रमाणात होत नाही. अभ्यासक्रमातील संशोधन मंडळाने इयत्ता 1 ली पासून मराठी व इंग्रजी विषय सक्तीचा व आपश्यक केलेला आहे.

भाषा हा शैक्षणिक स्तरावरील एक आवश्यक व महत्त्वाचा विषय आहे. विद्यार्थ्यांना भाषा विषयाचे सखोल ज्ञान होण्यासाठी शिक्षकाने भाषेतील बारकावे लक्षाज घेवून अध्यापन करणे गरजेचे व आवश्यक वाटते. शालेय अभ्यासक्रमात भाषा विषयाला अनन्य साधारण असे महत्त्व आहे.

Aarhat Publication & Aarhat Journalsis licensed Based on a work athttp://www.aarhat.com/eiirj/

## समस्या विधान –

आसराबाई दराडे इंग्लिश मिडियम स्कुल ( एस.एस.सी बोर्ड ) येथील 9 वी च्या विद्यार्थ्यांना अवांतर वाचनात आवड नसण्याच्या कारणांचा शोध घेणे.

## पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या –

1. शाळा – स्कूल – आसराबाई दराडे इंग्लिश मिडियम स्कुल, एकलहरे, नाशिक
2. विद्यार्थी – आसराबाई दराडे इंग्लिश मिडियम स्कुल, एस.एस.सी बोर्ड येथील इ. 9 वी च्या वर्गातील विद्यार्थी
3. अवांतर – शैक्षणिक पाठयक्रमाव्यतिरिक्त केलेले वाचन.
4. वाचन – अध्ययन अध्यापनातील एक आपश्यक कौशल्य
5. आवड – अभिरुची किंवा रस.
6. उपाययोजना – विद्यार्थ्यांसाठी अवांतर वाचनातील क्षमतेवर झालेला बदल.

**उद्दिष्टे –**

1. इ. 9 वी च्या वर्गातील अवांतर वाचन न करण्याऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
2. इ. 9 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
3. इ. 9 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनात येणाऱ्या अडचणींमागील कारणांचा शोध घेणे.
4. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी उपाययोजना वा कृतीकार्यक्रम तयार करणे.

**महत्त्व –**

विद्यार्थ्यांना भाषा विषयात आवड निर्माण करण्यासाठी संशोधन महत्वाचे ठरेल. तसेच विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाचे तंत्र समजेल विद्यार्थ्यांना भाषा विषयाचे सखोल ज्ञान होण्यासाठी सदर संशोधन महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. विद्यार्थ्यांचे भाषा व सामान्यज्ञान विषयातील प्रावीण्य संपादणूक क्षमता वाढविण्यासाठी सदर संशोधन विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी उपयुक्त ठरेल व विद्यार्थ्यांना वाचनातील बारकावे, कौशल्य विकसित होण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे ठरेल.

**मर्यादा –**

1. सदर संशोधन समस्या आसराबाई दराडे इंग्लिश मिडियम स्कूल एकलहरे नाशिक येथील इ. 9 वी पुरतेच मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे 2020 – 21 या वर्षासाठीच मर्यादित आहे.
3. प्रस्तुत संशोधन अवांतर वाचनात आवड नसणाऱ्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.
4. प्रस्तुत संशोधन हे वाचन कौशल्यासाठीच मर्यादित आहे.

**संशोधन कार्यपध्दती –**

प्रस्तुत संशांधनासाठी वर्णनात्मक पध्दतीमधील प्रायोगिक व वर्णनात्मक म्हणजेच मिश्र पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**नमुना निवड –**

प्रस्तुत संशांधनासाठी आसराबाई दराडे इंग्लिश मिडियम स्कूल एकलहरे नाशिक येथील 25 विद्यार्थ्यांची प्रासंगिक नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात आली होती.

**माहिती संकलनाची साधने –**

प्रस्तुत संशांधनासाठी माहितीचे संकलन करण्यासाठी विद्यार्थी मुलाखत , प्रश्नावली, पालक मुलाखत प्रश्नावली, शिक्षक मुलाखत प्रश्नावली त्यात विद्यार्थ्यांसाठी 10 प्रश्न, पालकांसाठी 10 प्रश्न, व शिक्षकांसाठी 10 प्रश्न हे प्रश्न अवांतर वाचनाविषयी होते तसेच विद्यार्थ्यांना पूर्व व उत्तर चाचणी प्रश्नावली एकूण 10 प्रश्नांची देण्यात आली होती.

**माहितीचे विश्लेषन –**

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, मध्यमान, व आलेखांचा वापर करण्यात आला होता.

**संशोधनाची कार्यवाही –**

1. अवांतर वाचन क्षमता तपासणी पूर्व चाचणीचे आयोजन –

इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांची अवांतर वाचन क्षमता पडताळण्यासाठी प्रथम 20 गुणांची पूर्व चाचणी 40 मिनिटे वेळ देवून सोडविण्यास दिली नंतर पूर्व चाचणीच्या निरीक्षणाची नोंद तक्त्यात केली व गुणपत्रक तयार केले.

2. नमुना निवड –

पूर्व चाचणी गुणपत्रकाचे विश्लेषण करुन ज्या विद्यार्थ्याला 10 पेक्षा कमी गुंण प्राप्त झाले होते अशा 10 विद्यार्थ्यांचा समावेश नमुना म्हणून केला.

3. कारणांचा शोध –

ज्या विद्यार्थ्यांना 10 पेक्षा कमी गुण प्राप्त झाले होते अशा विद्यार्थ्यांना कमी गुण मिळण्याची कारणे निरीक्षण, मुलाखत इ. साधनांच्या मदतीने शोधली.

4. प्रशिक्षण निर्मिती व अंमलबजावणी –

नमुना गटातील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाचे प्रात्यक्षिक कार्यक्रमाची निर्मिती व आयोजन करण्यात आले शालेय वेळेनंतर 30 मिनिटाच्या शालेय तासिका रोज 1 याप्रमाणे एकूण 30 दिवसांचे अवांतर वाचनाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले.

या प्रशिक्षणात पुढील बाबींचा समावेश केलेला होता.

अ. विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे अवांतर शैक्षणिक प्रश्न प्रत्यक्षरित्या दाखविण्यात आले.

ब. अवांतर वाचनाचे सर्व नियम एका मोठया संगणकीय डिजीटल कार्डवरती वर्गात लावण्यात आले.

क. पाठयपुस्तकाव्यतिरीक्त इतर विषय अवांतर वाचनाचा सराव करण्यात आला.

ड. विद्यार्थ्यांना गृहपाठासाठी अवांतर वाचनावर आधारित प्रश्न रोज दिले.

इ. वृत्तपत्रातील ठळक बातम्यांचे रोज वाचन करण्यात आले.

5. उत्तर चाचणीचे आयोजन –

प्रशिक्षणानंतर इ. 9 वी च्या नमुना गटातील विद्यार्थ्यांची अवांतर वाचन क्षमता पडताळण्यासाठी संशाधकाने पुन्हा सामान्य ज्ञान विषयाची 20 गुणांची अवांतर वाचनावर आधारित उत्तर चाचणी 40 मिनीटे वेळ देवून सोडविण्यास सांगितली नंतर उत्तर चाचणीच्या निरीक्षणांची नोंद निरीक्षण तक्त्यात केली व गुणपत्रक तयार केले.

6. पूर्व व उत्तर चाचणीतील तुलना –

पूर्व चाचणी व उत्तर चाचणी च्या माहितीचे विश्लेषण करुन दोन्ही चाचण्यांची तुलना संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करुन केली.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

*Volume-X, Issues-IV* *July - August 2021*

निष्कर्ष –

1. इ. 9 वी च्या वर्गातील अवांतर वाचनात विविध विद्यार्थ्यांना अडचणी / समस्या येतात.
2. विद्यार्थ्यांना अवांतर वाचनात विविध प्रकारच्या अडचणी येतात.
3. इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांना अवांतर वाचनात येणाऱ्या अडचनी म्हणजे निरसता, शैक्षणिक परीक्षेचा तान, आर्थिक परिस्थिती.
4. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी एकूण 30 दिवसांचे प्रशिक्षण आयोजन केले त्यात अवांतर वाचनावर भर देण्यात आला.
5. राबविलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनात सुधारणा व प्राविण्य आढळून आले.

सूचना व शिफारशी –

1. विद्यार्थ्याचे गट करुन अवांतर वाचनाचा सराव घ्यावा.
2. अध्यापनात विविध अध्यापन पध्दती व आधुनिक शैक्षणिक साधनांचा वापर करावा.
3. विविध अवांतर वाचन स्पर्धा प्रश्नमंजुंषा घेणे त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण होते.
4. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर शिक्षणाचे महत्त्व व जीवनाशी संबंध याची जाणीव निर्माण करावी.

समारोप

विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी शिक्षक पालक यांनीही लक्ष देणे आवश्यक आहे. शैक्षणिक प्रगतीसोबत विद्यार्थ्यांची अवांतर वाचनाची आवड वाढीस लागायला हवी व त्यातून सुजान नागरिक घडवावे लागतील.

संदर्भ –

1. मुळे व उमाठे ( 1998 ) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे
2. भिंताडे, वि.रा. ( 1999 ) शैक्षणिक संशोधन